पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलीत,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

# मराठी विभाग

## वार्षिक अहवाल

## २०१७-१८

प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ
सहाय्यक प्राध्यापक

प्रा.डॉ.राजश्री पवार
मराठी विभाग प्रमुख

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# मराठी विभाग

# वार्षिक अहवाल-२०१७-१८

## अभ्यागत तासिका

दिनांक ४ सप्टेंबर २०१७ रोजी श्रीमती ललिता वाणी यांनी प्रथम वर्ष द्वितीय भाषेतील अक्षरगंध यातील मन करा रे प्रसन्न या कवितेचे अध्यापन केले.

दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रा. संदीप अवसरमल यांनी बी. ए. तृतीय वर्षातील साहित्यशास्त्र या अभ्यासपत्रिकेतील साहित्याचे स्वरुप या प्रकरणाचे अध्यापन केले.

## भित्तीपत्रक

दिनांक १३ आक्टोबर २०१७ रोजी श्रीमती उषा दांडगे यांच्या हस्ते पावसातील कविता या विषयावर आधारित भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजी श्रीमती रेखा मेश्राम यांच्या हस्ते जाहिरात लेखन या विषयावर आधारित भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

दिनांक १ जानेवारी २०१८ ते १५ जानेवारी २०१८ या दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मोठया जल्लोषात पार पडला. या निमित्ताने ग्रंथदिंडी काढण्यात आली. ज्ञानेश्वरी गाथा, राज्यघटना, बायबल, कुराण हे ग्रंथ विद्यार्थ्यांनी डोक्यावर घेवून मराठी भाषेचा जयजयकार करीत महाविद्यालयाच्या शेजारच्या वस्तीतून दिंडी मिरविण्यात आली.

या पंधरवडयानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धा व त्याचे निकाल पुढील प्रमाणे

### काव्यवाचन स्पर्धा

प्रथम-कु. अंकिता गायके, द्वितीय-शेख शहारुख

### वक्तृत्व स्पर्धा

प्रथम-कु. मृणाली मनोरकर, द्वितीय-कु. मंगल सुरभैय्ये

### शुध्दलेखन स्पर्धा

प्रथम- कु. मृणाली मनोरकर, द्वितीय-रुपाली नागरे

मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे उद्घाटन प्रा. संदीप अवसरमल (भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी) यांच्या हस्ते करण्यात आले. तर समारोप प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. ऋषी बाबा शिंदे (मॉडेल कॉलेज घनसावंगी) हे होते. **सदरील पंधरवडयाचा अहवाल शासनास पाठविण्यात आला.**

## मराठी भाषा सप्ताह

दिनांक १७ ते २३ फेब्रुवारी २०१८ या दरम्यान मराठी भाषा सप्ताह महाविद्यालयात पाळण्यात आला. या निमित्ताने घेतलेल्या स्पर्धा व त्यांचे निकाल पुढीलप्रमाणे

**नाटयवाचन**

प्रथम-श्री लक्ष्मीकांत ढेपले, द्वितीय-कु. अंकिता गायके

**काव्यवाचन**

प्रथम-कु. मृणाली मनोरकर, द्वितीय-कु. मंगल सुरभैय्ये

## मातृदिन

दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजी महाविद्यालयात जागतिक मातृभाषा दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. चेतना महाविद्यालय, सावंगी, इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री, कोहिनूर महाविद्यालय, खुलताबाद यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. हमिद खान हे होते. तर अध्यक्षस्थानी डॉ. सर्जेराव ठोंबरे हे होते. या प्रसंगी पंधरा विविध भाषेतील सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी वेगवेगळया महाविद्यालयातून आलेले प्राध्यापक व विद्यार्थी यांची एकूण संख्या ७० होती. सर्वांचे ग्रंथ व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.

## मराठी भाषा गौरव दिन

दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी कुसुमाग्रजांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून पाळण्यात आला. यासाठी आयोजित कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती मीरा केदारे, सहशिक्षिका, संत सावता गुरुकूल फुलंब्री या उपस्थित होत्या. त्यांनी मातृभाषेवर प्रेम करा. तिचा वापर करताना लाजू नका, इंग्रजी येत नसल्याचा न्यूनगंड बाळगू नका असे अवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे

उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर होते. या प्रसंगी कुसुमागजांच्या कवितांचे वाचन करण्यात आले.

**अभ्यास सहल**

दिनांक ६ मार्च २०१८ रोजी भाषा विषयाची अभ्यास सहल सावता मंदीर फुलंब्री येथे आयोजित करण्यात आली. या सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी सावता महाराजांच्या अभंगांचे वाचन केले. त्याचा आशय प्राध्यापकांनी उलगडून दाखवला. तसेच सावता महाराजांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकण्यात आला. या सहलीत एकूण २५ विद्यार्थी सहभागी झाले.

प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ
सहाय्यक प्राध्यापक

प्रा. डॉ. राजश्री पवार
मराठी विभाग प्रमुख



दिनांक 21 फेब्रुवारी 2018 रोजी प्रा. रेखा मेश्राम यांच्या हस्ते भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले.



दिनांक 18 ऑक्टोबर 2017 रोजी श्रीमती उषा ढांडगे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी मराठी भाषा विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.



अभ्यागत तासिका घेताना प्रा. ललिता वाणी व उपस्थित विभागातिल विद्यार्थी



अभ्यागत तासिका घेताना प्रा. संदीप अवसरमोले व उपस्थित विभागातिल विद्यार्थी.



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त "मराठी भाषा आणि आपण" या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्रा. डॉ. आश्विन रांजणीकर.



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात काव्यवाचन स्पर्धेत कविता वाचन करताना विद्यार्थी, शाहरूख शेख.



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात शुद्धलेखन स्पर्धेत परिच्छेद लेखन सांगताना प्रा.डॉ. राजश्री पवार.



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त हस्ताक्षर स्पर्धेत सहभागी विद्यार्थी.



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन करताना प्रा. संदीप अवसरमल व उपस्थित विद्यार्थी.




मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या समारोपप्रसंगी बोलत असताना प्रा. ऋषीबाबा शिंदे व्यासपीठावर प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले व मराठी विभाग प्रमुख, डॉ. राजश्री पवार.



मराठी भाषा सप्ताहानिमित्त विविध स्पर्धांची माहिती देताना मराठी विभाग प्रमुख, डॉ. राजश्री पवार.




मराठी विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या अभ्यास सहलीचा आनंद व माहिती घेताना विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक.



मराठी भाषा गौरव दिनाच्या उद्घाटन प्रसंगी
श्रीमती. मीरा केदारे व उपास्थित प्राध्यापक व विद्यार्थी
अध्यक्ष :- उपप्राचार्य डॉ. पी. ए. कल्याणकर, डॉ. राजश्री पवार.




कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन करताना
विद्यार्थीनी कु. अंकिता गायके.



अभ्यागत तासिका घेताना प्रा. रेखा मेश्राम.